॥ मा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

## Dr. BABASAHEB AMBEDKAR CHAIR & STUDIES CENTRE

जा.क्र./डॉबाआंअवअकेंद्र/2024–25/111 दिनांक : 30/09/2024

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.

मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर.

मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, परभणी.

मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.

मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, पेठ, लातूर.

मा. समन्वयक, कै. उत्तमराव राठोड आदीवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट.

**विषय :** महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन प्रश्नोत्तरी स्पर्धा परीक्षेत महाविद्यालयातून जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होणेकरिता सहकार्य करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स, नागपूर या संस्थेने दिवसेंदिवस कमी होत असलेली वाचनाची आवड वृद्धींगत व्हावी, संशोधनात्मक विवेचन आणि विश्लेषणाची रुची वाढून त्यांच्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या पुस्तकांची समीक्षा करण्याची पात्रता निर्माण व्हावी, व त्या माध्यमातून भारतीय राज्यघटनेचे संवर्धन व्हावे, यासाठी विविध उपक्रमांद्वारे प्रयत्न करीत आहे.

विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्याची पात्रता निर्माण होऊन एक जबाबदार नागरिक बनण्याच्या दृष्टीने त्यांची वाटचाल सुरू व्हावी. या करिता ६ डिसेंबर, २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाणदिनी त्यांच्याद्वारे लिखित साहित्यावर आधारित राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन प्रश्नोत्तरी परीक्षेचे आयोजन राज्यातील शाळा / महाविद्यालयांच्या माध्यमातून करीत असून सदर परीक्षेत महाविद्यालयांतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी होणेकरिता सहकार्य करावे, असे सदर संस्थेने आवाहन केले आहे.

तरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स, नागपूर या संस्थेच्या वतीने आयोजित प्रश्नोत्तरी परीक्षेत महाविद्यालयांतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी होणेकरिता सहकार्य करावे, ही विनंती.

(सोबत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स, नागपूर या संस्थेचे पत्रक)

स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड * डॉ.बा.आं.अध्यासन व अभ्यास केंद्र * स्थापना 6 डिसें. 2009

डॉ. पी. विठ्ठल

संचालक,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र

प्रत महितीस्तव :

1) मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
2) मा. सीस्टीम एक्सपर्ट, (संगणक विभाग) सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circular Regarding On the occasion of Mahaparinirvana Day, State Level Ideological Greeting Quiz Competition Exam या शिर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home Page मधील Administration आणि Dr. Babasaheb Ambedkar Chair सदराअंतर्गत प्रसिध्द करावे.

Scanned with CamScanner

# Dr. Babasaheb Ambedkar

## NATIONAL ASSOCIATION OF ENGINEERS

NAGPUR - BRANCH

बहु सच्चं च सिप्पं च

Registration No. M/S/BOM/455/G.B.B.S.D./Dated 1.8.1988 and Registration No. F 12721 Bombay
80 G F. No. CIT-I/Tech./80G/D32/2014-15 Date 03/06/2014

**Office :** Dr. Babasaheb Ambedkar Sanskrutik Bhavan, Uroovela Colony, Wardha Road, Nagpur-15.
I **E-mail** : drbanae@gmail.com, I **Website** : www.banae.ngp.com I **Phone** : 2250208, 2250859





**EXECUTIVE COMMITTEE**
**2023 - 2025**

**PRESIDENT**
Er. Arvind S. Gedam
Mob. : 9422111738

**VICE-PRESIDENT**
Er. Ajay R. Sawatkar
Mob. : 9422508050

**SECRETARY**
Er. Jayant A. Ingle
Mob. : 9423412317

**JOINT SECRETARY**
Er. Dhammanand R. Manwar
Mob. : 9730000843

**TREASURER**
Er. Anup J. Sangode
Mob. : 9423686121

**INTERNAL AUDITOR**
Er. Nilesh R. Nakhale
Mob. : 8600047671

**MEMBERS**
Er. Ajay D. Pohekar
Mob. : 9422567677

Er. Jyotsna W. Chavhan
Mob. : 9423634733

Er. Piyush G. Dhule
Mob. : 9823441734

**STATE EXECUTIVE COMMITTEE REPRESENTATIVE**
Vice President
Er. Bhaskar Khobragade
Mob. : 9029225337

Organising Secretary
Er. Rewatkumar Borkar
Mob. : 8007378756


Ref. No.२२४/ बानाई नागपूर / अभिवादन परीक्षा २०२४

Date १४/०९/२०२४


OFFICE OF THE VIC...
S.R.T.M.U. Nanded
Inward No. 5256
Date of Receipt 27/9/24
Time :


प्रति,
मा. कुलगुरू
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

विषय : महापरिनिर्वाण दिना निमित्त राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन प्रश्नोत्तरी स्पर्धा परीक्षेचे आयोजन आपले विद्यापीठ अधिनस्त महाविद्यालयातून जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी करून घेण्याबाबत व सहकार्य करण्याबाबत..

महोदय,

आपणांस विदित आहे की, आमची डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स नागपूर ही संस्था मागील दहा वर्षांपासून विद्यार्थ्यांमध्ये दिवसेंदिवस कमी होत असलेली वाचनाची आवड वृद्धींगत व्हावी, संशोधनात्मक विवेचन आणि विश्लेषणाची रुची वाढून त्यांच्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या पुस्तकांची समीक्षा करण्याची पात्रता निर्माण व्हावी व त्या माध्यमातून भारतीय राज्यघटनेचे संवर्धन व्हावे यासाठी विविध उपक्रमांद्वारे प्रयत्न करीत आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्याची पात्रता निर्माण होऊन एक जबाबदार नागरिक बनण्याच्या दृष्टीने त्यांची वाटचाल सुरू व्हावी यासाठी आमची संस्था सतत प्रयत्नशील आहे. या प्रक्रियेत वर्ष २०१३ पासून आम्ही सातत्याने दरवर्षी ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण दिनी त्यांच्यद्वारे लिखित साहित्यावर आधारित राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन प्रश्नोत्तरी परीक्षेचे आयोजन राज्यातील शाळा / महाविद्यालयांच्या माध्यमातून करीत आहोत. आपल्या सहकार्याबद्दल मनस्वी आभार....!

वैचारिक अभिवादन परीक्षेचे प्रवेश शुल्क गट १ - करिता फक्त १०/- गट – २ करिता ५०/- शुल्क राहील.

या परीक्षेचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील.

<u>वैचारिक अभिवादन प्रश्नोत्तरी परीक्षा</u> : परीक्षा अभ्यासक्रम :

| गट:१ : | गट – २ : |
|---|---|
| अ) भारतातील जाती, त्यांचा उद्गम आणि विकास. | अ) जाती निर्मूलन |
| ब) अस्पृश्य मूळचे कोण..? | ब) राज्य आणि अल्पसंख्याक |
| क) मुक्ती कोण पथे..? | क) हिंदू कोड बिल |
| ड) बुद्ध आणि त्यांचा धम्म - खंड १ | ड) बुद्ध आणि कार्ल मार्क्स |
| | ई) बुद्ध आणि त्यांचा धम्म - खंड १ ते ५ |

प्रा. निकुंभ
28/9/24

Scanned with CamScanner

# Dr. Babasaheb Ambedkar
## NATIONAL ASSOCIATION OF ENGINEERS
NAGPUR - BRANCH

बहु सच्चं च सिप्पं च

Registration No. M/S/BOM/455/G.B.B.S.D./Dated 1.8.1988 and Registration No. F 12721 Bombay
80 G F. No. CIT-I/Tech./80G/D32/2014-15 Date 03/06/2014



**Office :** Dr. Babasaheb Ambedkar Sanskrutik Bhavan, Uroovela Colony, Wardha Road, Nagpur-15.
**E-mail :** drbanae@gmail.com, **Website :** www.banae.ngp.com **Phone :** 2250208, 2250859



**EXECUTIVE COMMITTEE 2023 - 2025**

**PRESIDENT**
Er. Arvind S. Gedam
Mob. : 9422111738

**VICE-PRESIDENT**
Er. Ajay R. Sawatkar
Mob. : 9422508050

**SECRETARY**
Er. Jayant A. Ingle
Mob. : 9423412317

**JOINT SECRETARY**
Er. Dhammanand R. Manwar
Mob. : 9730000843

**TREASURER**
Er. Anup J. Sangode
Mob. : 9423686121

**INTERNAL AUDITOR**
Er. Nilesh R. Nakhale
Mob. : 8600047671

**MEMBERS**
Er. Ajay D. Pohekar
Mob. : 9422567677

Er. Jyotsna W. Chavhan
Mob. : 9423634733

Er. Piyush G. Dhule
Mob. : 9823441734

**STATE EXECUTIVE COMMITTEE REPRESENTATIVE**

Vice President
Er. Bhaskar Khobragade
Mob. : 9029225337

Organising Secretary
Er. Rewatkumar Borkar
Mob. : 8007378756


Ref. No.

Date

- वरील पुस्तकांवर आधारित वस्तुनिष्ठ परीक्षा - १०० गुण ( वेळ : १: ०० तास )

➢ **" गट – १ " वर्ग ७ ते १२ कमाल वयोमर्यादा - १८ वर्ष**

➢ **" गट - २ तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी, महाविद्यालयीन विद्यार्थी, पदवी, पदविका, पदव्युत्तर.. कमाल वयोमर्यादा - २५ वर्ष.**

**<u>वै. अभि. परीक्षा बक्षिसे :</u>**

" गट – १ " प्रथम – १७,०००/-, द्वितीय – १३,०००/-, तृतीय – १०,०००/-

"गट – २ " प्रथम – २१,०००/- , द्वितीय – १३,०००/-, तृतीय – १०,००० /-

**प्रोत्साहनपर बक्षिसे :-** प्रत्येकी २०००/- रु. प्रमाणे पाच बक्षिसे ( दोन्ही गटाकरिता )

प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक शनिवार १४ ऑक्टोंबर २०२४ राहील.

ही संस्था विद्यार्थ्यांमध्ये उपरोक्त उद्दिष्टे रुजविण्यासोबतच इतरही अनेक सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. व त्यासाठी २०१९ ला **महाराष्ट्र शासनाचा शाहू - फुले - आंबेडकर पुरस्कार या संस्थेला प्राप्त** झाला आहे. ही आमच्या संस्थेसाठी प्रेरणा देणारी बाब आहे. व त्या प्रेरणेतूनच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. व या वर्षीही जास्तीत जास्त विद्यार्थी ह्या परीक्षेसाठी सहभागी व्हावेत हा आमचा मानस आहे.

आपणास विनंती करण्यात येते की शुक्रवार दि . ६ डिसेंबर २०२४ ला होणाऱ्या वैचारिक अभिवादन परीक्षेत सहभागी होण्यासाठी आपल्या अधिनस्त शाळा / विद्यालयांना आपले स्तरावरून निर्देश द्यावे आणि तसे संस्थेला अवगत करण्याची तसदी घ्यावी ही नम्र विनंती.

**मागील वर्षी आपल्या स्तरावरून महाविद्यालयांना निर्देशित करून परीक्षेमध्ये सहभागी केले याबद्दल आम्ही आपले मन:पूर्वक आभार मानतो व याही वर्षी आपल्या बहुमुल्य सहकार्याची अपेक्षा करतो.**

आपला स्नेहांकित,

( इंजी. जयंत इंगळे )
सचिव

प्रतिलिपी,
१) मा. प्राचार्य .............................................. महाविद्यालय .......................
२) महाविद्यालयीन कार्यक्रम अधिकारी.......................................................................यांना
माहिती व उचित कार्यवाही करिता सादर.

Scanned with CamScanner